
जब स्वभाव को धर्म के सिद्धांतों के अनुसार बदला जाता है, तब हमें संस्कृति और सभ्यता प्राप्त होती है।



पं. दीनदयाल उपाध्याय

# अंत्योदय

दीनदयाल सेवा प्रतिष्ठानचे वार्तापत्र

राष्ट्रहिताय दीनजनसेवा

facebook : Deendayal Bahuudeshiya Prasarak Mandal, Yavatmal

यवतमाळ । गुरुवार, १५ मे २०२५ । युगाब्द ५१२७ । e-mail : dindayalytl97@gmail.com, website : www.deendayalvidarbha.org


# 'दीनदयाल'च्या वतीने यवतमाळात विषमुक्त शेती निवासी प्रशिक्षण शिबीर

## शेती करणे हे येऱ्यागबाळ्याचे काम नव्हे ! - माऊली कापसे









दीनदयाल प्रबोधिनीतील विषमुक्त शेती कार्यशाळेत उपस्थित शेतकऱ्यांना संबोधित करताना सेंद्रिय शेतीतज्ज्ञ माऊली कापसे. व्यासपीठावर संस्थेचे सचिव विजय कद्रे व पदाधिकारी

'उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ नोकरी' या समीकरणाने शीर्षासन केलेल्या आजच्या काळात रासायनिक खते व कीटकनाशकांचा बेसुमार वापर आणि कुठलाही विचार न करता केले जाणारे काम म्हणजे शेती असा अनेकांचा गैरसमज आहे. वास्तविक, शेती करणे म्हणजे वेद, उपनिषदे व संहितांमधून सांगितलेली शेतीविषयक महत्त्वाची सूत्रे अभ्यासणे, कालसुसंगतपणे या ज्ञानाचा आपल्या शेतीमध्ये उपयोग करणे, नवनवे तंत्रज्ञान आत्मसात करणे व प्रयोग करणे आवश्यक असते. शेती करणे हे कोणा येऱ्यागबाळ्याचे काम नव्हे, असे प्रतिपादन विषमुक्त शेतीचे सुप्रसिद्ध प्रशिक्षक माऊली कापसे यांनी येथे केले.

दीनदयाल सेवा प्रतिष्ठानच्या वतीने निळोणा येथील दीनदयाल प्रबोधिनीमध्ये ३ ते ८ मे २०२५ दरम्यान आयोजित विषमुक्त शेती निवासी कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंचावर संस्थेचे सचिव विजय कद्रे, सहसचिव विवेक कवठेकर व सेंद्रिय शेती प्रकल्प समितीचे अध्यक्ष तथा शिबिर संयोजक बाबा कपिले प्रामुख्याने उपस्थित होते.

शेतीचा विकास, जमिनीचा पोत सुधार व शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी यावी यासाठी समर्पित सेंद्रिय शेतीतज्ज्ञ माऊली कापसे यांचे या शिबिरात प्रामुख्याने गोसंवर्धनाचा शेतीशी संबंध, शेतीची मशागत, कीड नियंत्रण, भू - सूक्ष्मजीवशास्त्र, नॅनो टेक्नॉलॉजी व होमा फार्मिंगचा वापर, प्राचीन भारतीय आयुर्वेद ग्रंथात वर्णलेल्या वनस्पतींचा आधुनिक शेतीमध्ये उपयोग, बीज संस्कार इत्यादी विषयात प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण दिले.

समारोपप्रसंगी उपस्थित महिला व पुरुष शेतकऱ्यांनी प्रशिक्षण कालावधीतील आपले अनुभव सांगून या प्रकारच्या शेती पद्धतीचा आपण आपापल्या ठिकाणी अवलंब करून विषमुक्त अन्नधान्य व भाजीपाला निर्मितीमध्ये महत्त्वाचा वाटा उचलून असे बोलून दाखवले संस्थेचे सहसचिव विवेक कवठेकर यांनी यावेळी संस्थेच्या कामाची माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन शिबिर संयोजक बाबा कपिले यांनी केले.

# पारधी व आत्महत्याग्रस्त शेतकरी मुलांसाठी 'दीनदयाल'च्या वतीने चालविल्या जाणाऱ्या विवेकानंद छात्रावासाचा दहावीचा निकाल शंभर टक्के

अंत्योदयाचे प्रणेते पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रेरणेने यवतमाळात दीनदयाल सेवा प्रतिष्ठानच्या वतीने विवेकानंद छात्रावास चालविले जाते. गावकुसाबाहेर राहणाऱ्या, शिक्षण, स्वास्थ्य आणि संस्कार यापासून वंचित असलेल्या या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी दीनदयाल संस्थेने १९९७ साली या छात्रावासाची स्थापना केली. रामकृष्ण नगर, मुलकी येथे एका छोट्या खोलीत पाच विद्यार्थ्यांसह सुरू झालेले छात्रावास तीन वर्षांपूर्वी जांब रोडवर जनक नगरीनजीक भव्य इमारतीत स्थानांतरीत झाले आहे.

गेल्या २७ वर्षात येथे ५०० हून अधिक मुले शिकून आपापल्या व्यवसायाला लागली आहेत. या छात्रावासात विद्यार्थ्यांना आणणे, त्यांच्यावर शिक्षा, स्वास्थ्य, स्वावलंबन, देशाभिमान इत्यादीचे संस्कार करणे हे खरेतर जिकरीचे कार्य आहे. त्यातून मुलांना संगणक शिक्षण व रोजगार प्रशिक्षण देण्याचाही संस्थेचा प्रयत्न असतो. अशावेळी मुले छात्रावासात आणणे, ते टिकवणे, त्यांनी अभ्यासाला लागणे आणि शालांत परीक्षेत उत्तम गुण प्राप्त करणे हे अधिकच कठीण कार्य; परंतु गेली काही वर्षे या कामात यश प्राप्त होत असून छात्रावासात राहणाऱ्या दहावीतील सर्व विद्यार्थ्यांनी परीक्षेत चांगले गुण प्राप्त करून दाखवले आहे.



कृष्णा हनुमान निखाडे



अमित सुक्रेश चव्हाण



सुमित गणेश पवार

यावर्षी अमित सुक्रेश चव्हाण या पारवा पारधी बेड्यावरील विद्यार्थ्यांने ७४.६० टक्के गुण प्राप्त केले. त्या खालोखाल खैरी येथील कृष्णा हनुमान निखाडे याने ७४.२० % गुण प्राप्त केले तर गोंडबुरांडा बेड्यावरील सुमित गणेश पवारने ६१.२० % गुण प्राप्त केले. दहावीतील तिन्ही विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्याचा आनंद या विद्यार्थ्यांचा अभ्यास घेणाऱ्या छायाताई पारवेकर, संजय दुधाट, आनंद विधाते या शिक्षकांसह पालकांनाही आनंद झाला आहे. दीनदयाल सेवा प्रतिष्ठानचे संचालक मंडळ, छात्रावास समितीचे अध्यक्ष प्रवीण किडे, सचिव तथा संचालक माधवी राजे यांनी या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक केले असून संचालन समितीला आपले अपेक्षित ध्येय गाठण्यामध्ये यश येत असल्याचे बोलून दाखवले.

# जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या वंशजांची दीनदयाल प्रबोधिनीला भेट









जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचे दहावे वंशज तथा तुकाराम महाराज संस्थान, देहूचे विश्वस्त ह. भ. प. माणिक महाराज मोरे आणि अध्यक्ष ह. भ. प. पुरुषोत्तम दत्तात्रय मोरे महाराज यांनी दीनदयाल प्रबोधिनीला भेट दिली.

यवतमाळच्या प्रवासात त्यांनी सकाळी निळोणा येथील प्रबोधिनी परिसरात आल्यानंतर सर्वप्रथम पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेस पुष्पार्चन केले. त्यानंतर शबरी अतिथीगृहात त्यांना संस्थेच्या कार्यावर आधारित माहितीपट दाखविण्यात आला. दीनदयाल सेवा प्रतिष्ठान पारधी व शेतकरी विषयात करीत असलेल्या कार्याबद्दल त्यांनी मुक्तकंठाने प्रशंसा करून आपले संस्थान कायम या कार्याच्या पाठीशी राहील, असे बोलून दाखविले. यावेळी त्यांचा संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. मनोज पांडे व सहसचिव विवेक कवठेकर यांनी शाल, श्रीफळ व 'दीनदयाल द्रष्टा तथा दृष्टी' आणि 'मोडला नाही कणा' या पुस्तिका देऊन सन्मान केला.





जगद्गुरु तुकाराम महाराज यांचे दहावे वंशज तथा तुकाराम महाराज संस्थान, देहूचे विश्वस्त ह. भ. प. माणिक महाराज मोरे आणि अध्यक्ष ह. भ. प. पुरुषोत्तम महाराज मोरे यांचे हस्ते पं. दीनदयालजींच्या प्रतिमेस पुष्पार्चन. संस्थेच्या वतीने सत्कार आणि दीनदयाल संस्थेची माहिती घेऊन अभिप्राय लिहिताना मान्यवर

# ड्रॅगन फ्रुट ने आणली आमोजच्या जीवनात समृद्धी



आनंदवाडी येथील युवक अमोज प्रकाश चव्हाण याने आपल्या माळरानावर असलेल्या बंजर जमिनीवर ड्रॅगन फ्रुट ची शेती करून एक नवा आदर्श शेतकरी वर्गासमोर ठेवला. गेल्या ५ वर्षापासून अमोज ही शेती करतो. माळरानावर विहिरीला पाणी नाही. एकरभर शेतात शेततलाव करून घेतला. त्या तलावातील पाणी ठिबका मार्फत या झाडांना दिले जाते. पावसाळ्यात सोयाबीन सारखे पीक सुद्धा काढल्या जाते. बाजूच्या शेतात पेरूचे उत्पन्न घेतल्या जाते. याच ड्रॅगन फ्रुट च्या शेतात सफेद मुसळी, दुध कांडी याचे सेंद्रिय पद्धतीने उत्पन्न काढत आहे. गेल्या ४ वर्षात एका एकरात ६० लक्ष रुपयांचे उत्पन्न झाले आहे. आता हे ५ वे वर्ष आहे. सफेद मुसळी हे पीक २५०० रुपये किलो आहे. तसेच दुध कांडीचे सुद्धा उत्पन्न यातून चांगला पैसा कमावतो आहे. याशिवाय ड्रॅगन फ्रुटची रोपे तयार करून १७ रुपयांना एक याप्रमाणे यवतमाळ, अमरावती, नागपूर येथे विक्री केली जाते. अशा पद्धतीने परंपरागत शेतीला फाटा देत अमोज नवीन प्रयोग आपल्या शेतीत करीत आहे.

## गौरव : आरोग्य रक्षिकेचा



धामणी बेडा ता. यवतमाळ येथील अंत्योदय प्रकल्प समिती संचालिका, धामणी येथील आरोग्य रक्षिका **पूजा धनराज राठोड** यांची अंगणवाडी मदतनीस म्हणून निवड झाल्याबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला.

## क्रांतिकारक समशेरसिंग भोसले : अभिवादन







## संस्थेच्या पाठीशी उभे राहिलेले देणगीदार

१) Rashmi Advertisement, Mumbai
२) श्री. हितेश मुंधडा, यवतमाळ
३) Bank of Maha. Retired Employees Welfare Orgnisation, Pune
४) श्री. अतुल अशोक चोरडीया, पुणे
५) श्री. अशोक धनराज चोरडीया, पुणे
६) Raj Path Infracon Pvt. Ltd. Pune
७) SMS Limited, Nagpur
८) Mr. Mannur Maruthi Vandith Reddy, Bangalore
९) अदिती देशपांडे, नागपुर
१०) K. RAHEJA CORP PRIVATE LIMITED, Mumbai
११) GENEXT HARDWARE & PARKS PVT. LTD., Mumbai
१२) नियती पाठक, भोपाळ
१३) श्री. दत्तात्रय दामोधर देवल, पुणे
१४) श्री. केतनकुमार मायर, मुंबई
१५) BRAIN POINT INVESTMENT CENTER PVT. LTD., Mumbai